# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाविद्यालय व विद्यापीठ**
**विकास मंडळ,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**गणेशखिंड, पुणे-४११००७**

दूरध्वनी : ०२०-२५६०१२५५/५६
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
इ-मेल : bcud@unipune.ac.in

संदर्भ क्र. : CA/1125

दिनांक : 19/03/2015

## जाहीर सूचना

विषय : शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील २१ महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे संलग्नीकरण कायमस्वरूपी रद्द करण्यासंदर्भात.

खाली नमूद केलेल्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८१ (१) (एफ) व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अध्यादेश क्र. १७९ (३) मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. यासंदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहार करून तसेच कारणे दाखवा नोटीस बजावूनही संबंधित महाविद्यालयांनी कोणत्याही पत्रास व कारणे दाखवा नोटिशीसही लिखित स्वरूपातील कोणताही खुलासा विद्यापीठाकडे सादर केलेला नाही. तसेच दि. ५ मार्च, २०१५ रोजी विद्यापीठामध्ये समक्ष उपस्थित राहून मा. कुलगुरू यांच्याकडे काही माहिती, खुलासा सादर करावयाचा असल्यास त्याप्रमाणे संबंधित महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना संधीही देण्यात आली होती. तथापि, संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या कोणत्याही पत्रव्यवहाराचे उत्तर दिलेले नाही. तसेच दि. ५ मार्च, २०१५ रोजी त्यांची बाजू मा. कुलगुरू यांच्यापुढे मांडण्यासाठी उपस्थित राहण्याबद्दल सूचना देऊनही संबंधित महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे विद्यापीठाने पत्र क्र. सीए/१०६२, दि.१३ मार्च, २०१५ नुसार खालील महाविद्यालयांना सर्व अभ्यासक्रमांचे प्रथमवर्षाचे संलग्नीकरण कायमस्वरूपी रद्द करण्यात येत आहेत असे कळविले आहे.

१) प्रज्ञा ग्रामीण आणि आदिवासी संस्थेचे, प्रज्ञा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बुरुडगांव, अहमदनगर, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर

२) महाराष्ट्र इंन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन ॲण्ड डेव्हलपमेंट नॉर्थसागर कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स, राज्य कर्मचारी वसाहत, समता नगर, सावेडी, अहमदनगर, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर

३) नवीनभाई शाह प्रतिष्ठानचे, नवीनभाई शाह कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड कॉम्प्युटर स्टडीज, अकोला नाका, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

४) शिक्षण प्रसारक मंडळाचे, श्री दत्तदिगंबर कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अवसरी बु., ता. आंबेगाव, जि. पुणे

५) भीमा शैक्षणिक न्यास, सुभाष अण्णा कुल, कला, वाणिज्य व विज्ञान कॉलेज, मु. पो. मधुकरनगर, पाटस, ता. दौंड, जि. पुणे

६) युनिटी एज्युकेशन ट्रस्टचे, युनिटी नाईट कॉलेज, आशिष प्लाझा, ८२, २४ डी. पी. रोड, कोथरुड, पुणे–४११०३८

७) श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे, विलास तांबे महिला महाविद्यालय, पो. ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे

८) शिवनेरी बहुउद्देशिय सेवाभावी शिक्षण संस्थेचे, शिवनेरी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, मु. पो. आणे, ता. जुन्नर, जि. पुणे

९) पसायदान एज्युकेशन सोसायटीचे , कॉलेज ऑफ बीबीए ॲण्ड बीसीए, पो. कुरुळी, ता. खेड, जि. पुणे, चाकण ४१०५०१

१०) अग्रवाल विद्याप्रसारक मंडळ, गीता विद्यानिकेतन कॉलेज ऑफ इलेक्टॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड मॅनेजमेंट, ३३२, ३३३ मुंबई–पुणे रोड, सोमाटणे फाटा, ता. मावळ, जि. पुणे

११) नामदेवराव मोहोळ विद्या आणि क्रिडा प्रतिष्ठान, कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे

१२) इग्नाईटेड माइंड सोसायटीचे, मुळशी इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स, मुळशी, संभावे, ता. मुळशी, जि. पुणे–४१२१०८

१३) शिक्षण महर्षी डॉ.डी.वाय.पाटील शिक्षण संस्थेचे, एस.एम. डॉ. डी.वाय.पाटील ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड बिझनेस स्टडीज (बीबीए) १६२ जीपी जी ब्लॉक एमआयडीसी, चिंचवड, पुणे–१९

१४) मेट्रोपॉलीटन एज्युकेशन ट्रस्टचे, मेट्रोपॉलीटन महाविद्यालय, प्लॉट नं १, अमरसृष्टी सि. नं. १५ खराडी नॉलेज पार्क, खराडी, पुणे–४११०१४

१५) बेहरेज एज्युकेशन सोसायटीचे, बेहरेज कॉलेज ऑफ कॉमर्स, २३४ सागरदीप नवी पेठ, पुणे–४११०३०

१६) शांती एज्युकेशन फाउंडेशनचे, शांती कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, हडपसर, पुणे

१७) लाला शिवलाल मित्तल मेमोरीयल ट्रस्टचे, वुड्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट, स.नं. ७१, मुंबई–बैंगलोर हायवे, चांदणी चौकाजवळ, पुणे–३८

१८) बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड बीसीए ॲण्ड बीबीए, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे–४१२२१०

१९)एमसीई सोसायटीचे स्कुल ऑफ आर्ट, आझम कॅम्पस कॅम्प, पुणे, जि. पुणे

२०)विश्वकला निकेतन एज्युकेशनल ट्रस्टचे, विश्वकला निकेतन महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे–४११००२.

२१)डाटा सिस्टम रिसर्च फाउंडेशन कॉमर्स कॉलेजचे, प्लॉट नं. १ पी १ सि.नं १५ खराडी नॉलेज पार्क, खराडी, पुणे–४११०१४

उपरोक्त सर्व वस्तुस्थितीचा विचार करता महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ९१ (४) मधील तरतुदीनुसार तसेच मा. विद्यापरिषदेच्या दि. ३० डिसेंबर, २०१४ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. वि.प.अ/२१ पीए/२१ नुसार तसेच मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. १९ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. मः५९/१९०११५ यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षापासून वर नमूद केलेल्या २१ महाविद्यालयांच्या सर्व अभ्यासक्रमांचे प्रथमवर्षाचे संलग्नीकरण कायमस्वरूपी रद्द करण्यात येत आहेत. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

संचालक
(म.वि.वि.मं.)

प्रत :

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, म. राज्य, मुंबई-३२.
२. मा. कुलपती यांचे उपसचिव, राजभवन, मुंबई-३५.
३. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
४. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
५. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
६. जनसंपर्क अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.